LOK MAHAVIDYALAYA, WARDHA

DEPARTMENT OF LIBRARY SCIENCE

# M.Lib. Sem - IV




## Paper - IV

# Intellectual property Right

## ४.९ बौध्दिक संपदा हक्क : (IPR) Intellectual Property Right

मुद्रित साहित्याचे पुनरमुद्रण करत असताना लेखक, प्रकाशक वा त्या एका व्यक्तीकडे लेखकाने पुनरमुद्रणाचे हक्क सुपुर्द केलेले असतात. असे हक्क लेखक स्वत:कडे, जवळचा नातेवाईक अगर मित्राकडे किंवा एखाद्या संस्थेकडे सुपुर्द करतो. यासाठी पुस्तकाच्या शीर्षक पृष्ठाच्या मागील बाजूस © असे संक्षेपदर्शक चिन्ह असते. अर्थात कॉपीराईट हा केवळ पुनरमुद्रणाकरिता विचारात घेणे इतकाच त्याचा अर्थ मर्यादित नाही. प्रतिलिपी तंत्रज्ञानाचा अवलंब



केला जाईपर्यंत सर्व साधारणत: या कायद्याचे उल्लंघन संभवत नव्हते. प्रतिलिपी तंत्रज्ञानाच्या आगमनाने कोणत्याही मुद्रित साहित्याच्या प्रती सहजपणे उपलब्ध होऊ लागल्या. यामुळे मुळ मुद्रित साहित्याच्या वापरावर त्याचा गंभीर परिणाम जाणवू लागला आहे. सर्व सामान्यत: या कायद्याच्या अवलंबामुळे वैध स्वरुपात वा कायदेशीर मार्गाने प्रतिलिपीकरण व पुनरमुद्रण करता यावे हा उद्देश आहे. आजकाल मात्र सर्रासपणे या कायद्याचे उल्लंघन करुन कोणत्याही मुद्रित साहित्याच्या प्रती झेरॉक्स केंद्रावर उपलब्ध होऊ लागल्या आहेत. अर्थात हा कायदा जरी अस्तित्वात असला तरी देखील त्याचा अवलंब करणे व्यवहार्य ठरत नाही. एकुण हा कायदा आज केवळ नैतिकतेवरच अवलंबून असल्याचे दृष्टोत्पतीस येते.

या कायद्याचे स्वरुप आंतरराष्ट्रीय असून प्रथम या कायद्याची निर्मिती खऱ्या अर्थाने स्वीत्झर्लंडमधील बर्न या गावी दुसऱ्या महायुध्दानंतर झाली. या ठिकाणी भरलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत लेखकाचा बौध्दिक संपदा हक्क मान्य करून हा हक्क लेखकाच्या हयातभर शिवाय त्याच्या मृत्यूनंतर लेखकाने सूचविलेल्या वारसास ५० वर्षापर्यंत मानण्याचे ठरले. यानंतर लेखकाचे लेखन हे सार्वजनिक मालकीचे ठरविण्यात आले. असे असले तरी त्यातील जरतरीचे स्वरुप गुंतागुंतीचे आहे.

मुळत: या कायद्या संदर्भातील धोरण हे लेखक आपल्या बौध्दिक शक्तीच्या सहाय्याने तो एक निर्मीती करिता असतो. यास्तव या निर्मिती संदर्भातील त्याचा हक्क अबाधित असला पाहिजे. यामागची मुलभूत मुमिका ज्ञानसाधन निर्मिती ही लेखकाची हक्क असलेली उत्पादितता असते. अशा बाबीचे प्रसरण वा वितरण होत असताना त्याचे मुल्य/ मोबदला निर्मात्याला मिळाला पाहिजे. जर असा हक्क अबाधित ठेवला गेला नाही तर सहाजिकच नवनिर्मिती प्रक्रियेस अप्रत्यक्ष खिळ बसेल. ज्ञान निर्मितीची साधने आवश्यक त्या गतीने निर्माण होतील व परिणामत: ज्ञान प्रसारणावर परिणाम होईल. प्रत्यक्ष एकसारखी निर्मिती अवैध मार्गाने उपयोगात आणली गेल्यास निर्मात्याचा

हक्क डावलल्याने त्याच्यामध्ये उदासिनता निर्माण होईल व मानवी संस्कृतीच्या विकासाकरिता आवश्यक असलेले ज्ञान अस्तित्वात येणे कठीण होऊन बसेल. सध्याचे जग हे ज्ञान विस्फोटाचे जग आहे. रोज रोज नव्या संकल्पना अस्तित्वात येऊन त्याचा परिणाम हा मानवाच्या गतीमान जीवन पध्दतीचा एक अविभाज्य भाग बनलेला आहे. याकरिता नव निर्मितीस चालना मिळण्याकरिता व निर्मात्यास प्रोत्साहीत करण्याकरिता 'बौध्दिक संपदा हक्काची' निर्मिती करण्यात आलेली आहे.

**बौध्दिक संपदा हक्काचे प्रकार :**

ज्ञान साधनाचा विचार करता बौध्दिक संपदा हक्काच्या दृष्टीने विचार करता पुढील ज्ञानसाधनांचा यामध्ये अंर्तभाव करण्यात येतो.

१) विविध शोध व त्या व्यक्तिकरिता निर्माण झालेली पेटंटस - अशी पेटंटस शासन वा विभागीय कार्यालये यांच्या व्दारे नोंदवली जातात. याकरिता या सर्वांचीच अधिकृतता पडताळून पाहिली जाते. या पेटंट हक्काची कालमर्यादा साधारणपणे २० वर्षापर्यंत असते. तसेच याकरिता सादर केलेले प्रलेख हा पेटंटच्या विशिष्ट आकृतीबंधात नोंदविणे गरजेचे असते.

२) कॉपीराईट - साहित्य, ग्रंथ निर्मिती, लेख ही लेखकाची स्वतःची निर्मिती असल्याने तसेच मनोरंजनाची साधने ही लेखक, प्लेरायटर, कंपोझर, कलाकार व चित्रपट निमति यांची निर्मिती असते. यातील विशेष निर्मिती ही व्यक्तीसापेक्ष असते. अशा उत्पादनाचे आयुष्य हे लेखक वा निर्मात्याच्या आयुष्याशी संबंधीत असल्याने या प्रकारातील प्रलेखांचे कॉपीराईटस हे ५० वर्षापर्यंत अबाधित ठेवलेले असतात, जेणेकरुन संबंधित निर्मात्यास त्याच्या आयुष्यात अशा निर्मितीकरिता मोबदला मिळावा.

वरील स्वरुपाच्या विविध प्रकरणांबरोबरच ट्रेड मार्कसत्वा ही बौध्दिक संपदेच्या दृष्टीने विचार करण्यात आलेला आहे. व्यवसाय, व्यापाराची नावे, ज्याव्दारे ग्राहकास एक निश्चित व शाश्वतता वाटते याचा विचार करुन निर्मिती हक्काचा विचार करण्यात आलेला आहे. ट्रेड मार्कस करिता कोणतीही



कालमर्यादा निश्चित केलेली नाही.

**स्वामित्व कायद्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

विद्यमान जग हे ज्ञानाचे, विज्ञानाचे आणि तंत्रज्ञानाचे जग म्हणून ओळखले जाते. या पार्श्वभूमीवर ज्ञान व ज्ञानावर आधारित निर्मिती साधने यास अनन्य साधारण महत्व प्राप्त झालेले आहे. यामुळे ज्ञान निर्मितीस प्रोत्साहन प्राप्त झालेले आहे. ज्ञान निर्मितीस प्रोत्साहन प्राप्त होण्याच्या दृष्टीने जागतीक पातळीवर विविध संमेलने, परिषदांमधून चर्चा होऊन बौध्दिक संपदा हक्क ही संकल्पना अस्तित्वात आली, मुद्रण कलेचा विकास होत असताना सुरवातीस मुद्रकाना 'स्टेशनटस' असे संबोधण्यात येई. या मुद्रकांनी १५३४ च्या कालखंडात महत्वपूर्ण अशा पाश्चात्य ग्रंथांच्या निर्मितीचे संपादन केले. १५५६ मध्ये मॅरीने अनेक धार्मिक अडथळ्यांना सामोरे जात मुद्रकांची कंपनी स्थापन केली. यामुळे निर्मिती वस्तूच्या हक्काना एक शक्ती व संरक्षण प्राप्त झाले. यामुळे मुद्रकाला आपल्या मुद्रीत साधनांची ( ग्रंथाची) नोंदणी करणे आवश्यक ठरले. तरी देखील प्रत्यक्ष कायद्याचा दर्जा प्राप्त होण्यासाठी याकरिता खुप कालखंड व्यतीत झाला. १६६२ मध्ये संसदेव्दारे चार्ल्स II याने यास अधिकृतता दिली. पण पुढे त्याची अधिकृतता १६६७ मध्येच संपुष्टात आली. अशा पार्श्वभूमीवर १६८५ मध्ये जेम्स ए याने त्यास पुनरुज्जीवन दिले पुढे राजकीय वातावरणात १६९४ मध्ये हे अस्तित्व पुनश्च संपुष्टात आले. मुद्रकाच्या संघटना व प्रबोधन याव्दारे १७१० मध्ये कॉपीराईट ॲक्टला निश्चित स्वरुप प्राप्त झाले. त्यानुसार प्रथम प्रकाशनानंतर १४ वर्षापर्यंत प्रकाशनाचे हक्क शाबीत ठेवण्यांत आले. विविध स्तरावरील निर्मात्याकडून वेळोवेळी केलेले संघर्ष व संघटनात्मक प्रयत्न यांनी १८१४ मध्ये या अधिकाराची मर्यादा २८ वर्षापर्यंत वाढविण्यात आली. आंतरराष्ट्रीय स्तरावर ब्रिटन, अमेरिका या राष्ट्रांच्या प्रयत्नांनी १९११ चा कॉपीराईट कायदा अस्तित्वात आला. त्कयामध्ये वेळोवेळी कालसाक्षेप सुधारणा होवून पुढे १९५६ चा कॉपीराईट कायदा अस्तित्वात आला. यावेळी यामध्ये आमुलाग्र बदलू होवून चित्रपट निर्मिती, आकाशवाणी

आणि टंकलिखीत आकृतीबंधाचा यामध्ये समावेश करण्यात आला.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील पार्श्वभूमीचा विचार करता -

१) यु. सी. सी (The Universal Copyright Convention) याव्दारे युनायटेड स्टेटसने आंतरराष्ट्रीय स्तरावर आंतरराष्ट्रीय कॉपीराईट कायद्याचे एक जाळे निर्माण करण्याचा सक्षम प्रयत्न केला.

२) यु. सी. सी. चा विकसनशील देशाकरिता विकास - (The stockholm and Paris Revisions of U.C.C.) व्दारे विकसनशील देशाकरिता विचार करुन या कायद्यास बौध्दिक संपदा हक्काचे स्वरुप (Intellectual Property Right) प्राप्त करुन देण्यात आले.

३) The Copyright Designs and Patents Act -1988 -तंत्रज्ञानाच्या अवलंबामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर कॉपीराईट कायद्यामध्ये पुन्हा बदल करणे गरजेचे ठरुन त्यासाठी काही सुधारणा या कायद्याव्दारे करण्यात आल्या. तंत्रज्ञानामुळे फोटोकॉपीइंग ऑडीओ -व्हीडीओ, टेपींग, संगणक यांच्या स्त्रोत निर्मितीमधील अंर्तभावामुळे ब्रिटीश कायद्यात सुधारणा करणे क्रमप्राप्त ठरले.

तंत्रज्ञानामुळे झालेल्या अमुलाग्र बदलाचा विचार होऊन-

अ) Berne convention

ब) Bene convention for the protection of performers, producers of phonograms and brodcasting organisation.

क) TRIPS ( Trade Related Intellectual Property तरतूद Rright)

यांचा समावेश कॉपीराईट अंतर्गत करण्यात आला यामुळे परफॉर्मन्स, साऊंड रेकॉर्डींग निर्मिति, ब्रॉडकास्टरस् यांना बौध्दीक संपदा कायद्याचा हक्क प्राप्त झाला.

जागतिक स्तरावर हा बदल होत असताना सहाजिकच त्याचे पडसाद भारतासारख्या विकसनशील देशात उमटून कालसापेक्ष बौध्दिक संपदा कायद्याचे अस्तित्व विकसित होत राहिले.

**भारतातील बौध्दिक संपदा कायद्याची वाटचाल :**



बौध्दिक संपदा कायद्याचा आंतरराष्ट्रीय प्रसार आणि विकास होता होता तो विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात भारतात प्रवेश करता झाला. ब्रिटीश छत्राखाली असलेल्या भारतात १९११ ला या कायद्याचा अवलंब लागू करण्यात आला. कालसापेक्ष त्यामध्ये होणाऱ्या सुधारणा आंतरराष्ट्रीय स्तरावर होत असताना भारतातील या कायद्यांतही १९१४ साली सुधारणा करण्यात आली. भारताच्या स्वातंत्र्यानंतर खऱ्या अर्थाने येथे स्वामित्व कायद्याची नव्या स्वरुपात अम्मलबजावणी १९५७ पासून करण्यात आली. जागतिक स्तरावरील या कायद्यात होणाऱ्या परिवर्तनाचे स्वरुप लक्षात घेवून १९८३ साली या कायद्यात सुधारणा करण्यात आली. दरम्यान जगभर तंत्रज्ञानाच्या प्रभावाने या कायद्यात अमूलाग्र बदलाची व नव्या जाणीवांची दखल घेवून बौध्दिक संपदा कायद्यात बदल करण्यात आले. या बदलाला गॅट करारामुळे अधिकच महत्व प्राप्त झाले. तंत्रज्ञानामुळे झालेल्या बदलामुळे आदानप्रदान व दूरवर प्रसारण यांची सुलभता विचारात घेवून भारतात २००० साली या संदर्भातील बाबींचा आंतरभाव करण्यात आला. १९८४ पासूनच कायद्याचे उल्लंघन करण्यास गंभीर शिक्षेची तरतूद करण्यात आलेली आहे. याचे स्वरूप हे बेकायदेशीरपणे साहित्य निर्मिती आणि अशा बाबीव्दारे लाभ उठविणाऱ्यास तीन वर्षांच्या कारावास व दोन लाख रु. इतका दंड तर व्यापारी वापर केल्यास ६ महिने कैद व रु. पन्नास हजार दंड अशी तरतूद करण्यात आली आहे. वारंवार या कायद्याचा भंग करणाऱ्या व्यक्तींना अधिक शिक्षा करण्याची तरतूद ही करण्यात आलेली आहे. या बाबींमुळे कायद्याची अंमलबजावणी करता येते. प्रत्यक्षात यासाठी सामाजिक मानसिकता निर्माण होणे गरजेचे आहे. सर्व दूर पसरलेले तंत्रज्ञान व अपुरी यंत्रणा यामुळे या कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे व प्रभावीपणे करणे ही बाब तशी सोयीची नाही.

**ग्रंथालये आणि (IPR) कायद्यातील तरतूदी :**

भारतामध्ये अस्तित्वात असलेल्या बौध्दिक संपदा हक्क कायद्यातील तरतूदी कलम ५१ मध्ये अंतरभूत करण्यात आलेल्या आहेत. तर प्रत्यक्ष

कायदेभंगाचे स्वरुप कसे असेल ते कलम ५२ नमूद केलेले आहे. ५१ अ) एखाद्या व्यक्तीचे स्वामित्व अधिकार धारण केलेल्या व्यक्तीकडून अथवा स्वामित्व प्रबंधकाकडून अधिकार प्राप्त करुन न घेता अथवा अशा मिळालेल्या अधिकारातील अटींचे पालन न करता-

१) या कायद्यान्वये स्वामित्व धारण करणाऱ्या व्यक्तीच्या अधिकारातील काही कृत्य केले असेल,

२) नफा कमविण्यासाठी एखाद्या ठिकाणी जनतेसाठी प्रयोग लावला असेल ज्यामुळे स्वामित्व कायद्याचा भंग होईल. मग त्यास या कायद्याची माहिती नसली तरीही हे कायद्याचे उल्लंघन होईल.

५१ब) जेव्हा एखादी व्यक्ती-

१) एखादी साहित्यकृती, भाड्याने उपलब्ध करुन देत असेल, विक्री करिता असेल. व्यापारी तत्वावर जाहिरात करिता असेल किंवा विक्री अथवा भाड्याने देण्याचे ठरवीत असेल,

२) व्यापाराकरता वाटप करिता असेल किंवा स्वामित्व अधिकार धारण करणाऱ्या व्यक्तीच्या हितास जाणीवपूर्वक बाधा आणीत असेल किंवा व्यापाराच्या हेतूने जनतेत प्रदर्शित करिता असेल किंवा

३) भारतात स्वामित्व हक्काचा भंग करुन एखाद्या साहित्यकृतीच्या प्रती भारतात आयात करिता असेल.

थोडक्यात, एखाद्या साहित्यकृतीच्या प्रतीपासून आणखी प्रती तयार करताना झेरॉक्स करताना वरील तरतुदींचा बारकाईने अभ्यास करण्याची गरज आहे. त्या दृष्टीने कलम ५२ मधील तरतुदी महत्वाच्या आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

५२) स्वामित्व कायद्याचा भंग होत नाही अशा कृती :

खालील बाबतीत स्वामित्व कायद्याचा भंग झाला नाही असे समजले जाईल:

अ) एखाद्या साहित्यकृतीचा, नाटकाचा संगीत अथवा कलात्मक कृतीचा खालील



कामाकरिता केलेला वाजवी वापर

१) संशोधन अथवा खाजगी अभ्यास

२) एखाद्या कृतीचे समीक्षण, मग ते प्रत्यक्ष साहित्यकृतीशी अथवा इतरांशी संबंधित असलेले.

ब) एखाद्या साहित्यकृतीचे, नाटकाचे, संगीत अथवा कलात्मक कृतीचे ताज्या घडामोडींबाबत वृत्त देण्याकरिता केलेला वाजवी वापर.

१) वृत्तपत्रात, मासिकात अथवा नियतकालिकामध्ये केलेला वापर

२) नभोवाणी प्रसारणात एखाद्या चित्रपटात अथवा छायाचित्रात वापर केला असलेस.

याशिवाय याच कलमातील अन्य तरतुदीनुसार न्यायालय, विधानमंडळ आणि सरकारी कामाकरिता आवश्यक असल्यास प्रत तयार करण्याची परवानगी देण्यात आली आहे. कलम (h) अंतर्गतची तरतूद शैक्षणिक दृष्ट्या महत्वाची आहे, ज्यामध्ये

१) शिक्षक अथवा विद्यार्थ्यांनी अध्ययनासाठी अथवा अध्यापनासाठी प्रत तयार केल्यास;

२) परीक्षेचा भाग म्हणून वापरल्यास,

३) त्या प्रश्नांची उत्तरे म्हणून तयार केल्यास.

अशा तरतूदी प्रत्यक्षात अंतरभूत करण्यात आलेल्या असल्या तरी देखील कलम (१) प्रमाणे स्वामित्व अधिकार असलेल्या व्यक्तीकडून सम्मती घेणे व प्रत्यक्ष या परवानगीनंतर सदर प्रतींच्या वापराचे स्वरुप संबधीतास स्पष्ट करुन त्या तरतूदीनुसार मुख्य स्वामित्व धारकास निर्धारीत रक्कम देणे हे बंधनकारक आहे. तसेच कलम (०) अंतर्गत सार्वजनिक ग्रंथालयास भारतात उपलब्ध नसलेल्या ग्रंथाचा येथील वाचकास लाभ द्यावयाचा असल्यास अधिकाधिक तीन प्रती तयार करण्याची सवलत देण्यात आलेली आहे. प्रतींच्या उपलब्धततेची खात्री करण्याकरिता संबंधीत प्रकाशक वा वितरक यांचेकडून लेखी प्रमाणपत्र घेणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. यातील विशेष बा

म्हणजे एखाद्या ग्रंथाची मुक्तपणे निर्मिती करण्यासाठी लेखकाच्या मृत्यूनंतर ६० वर्षे व मूळ निर्मिती ही एकाहून अधिक लेखकानी केली असल्यास अंतिम लेखकाच्या मृत्यू पश्चात साठ वर्षे अशी ही कालमर्यादा निर्धारित करण्यात आलेली आहे.

**ग्रंथालयाच्या दृष्टीने विचारात घ्यावयाच्या बाबी:**

बौध्दिक संपदा हक्काचा विचार करत असताना ग्रंथालयाशी त्याचा निकटचा संबंध असल्याने या संदर्भातील माहिती ग्रंथालय क्षेत्रातील व्यक्तींना असणे गरजेचे आहे. प्राथमिक स्तरावर जरी संशोधन ग्रंथालये औद्योगिक ग्रंथालये व विशेष ग्रंथालये यांच्याशीच हा कायदा संबंधीत आहे असे जाणवत होते. आज संगणक व दूर प्रसारण तंत्रज्ञान यांचा वापर सर्वसामान्य ग्रंथालये स्तरावर केला जावू लागला आहे. संशोधन व त्यावर आधारीत उपयोगीता व त्या अनुषंगाने साधन निर्मिती व या साधनाचे प्रत्यक्ष व्यापारी तत्वावरील वितरणाकरिता पेटंट निर्मिती याचा अवलंब केला जात असल्याने आणि अशा नव्या संशोधनाचा शोध ग्रंथालयाव्दारे घेणे शक्य झाले असल्याने आजकाल सर्वस्तरीय ग्रंथालयानी याबाबत जागरूक राहणे गरजेचे आहे. पूर्वी असा शोध केवळ संशोधन, औद्योगिक संस्थांशी संबंधित ग्रंथालयाव्दारेच घेतला जात असे. पण आजकाल शोध घेणे व्यापक स्वरुपात शक्य झाल्यानेच सर्व स्तरीय ग्रंथालयानी ही दक्षता घेणे गरजेचे आहे. अशा दक्षतेचे स्वरुप-

१) साहित्यकृतीचे सादरीकरण ( नाटक, एकांकिका, प्रवेश)

२) संगणक आज्ञावली बेकायदेशीर मार्गाने उपयोगात आणणे.

३) इतर दृकश्राव्य साधना (उदा. टेप्स, सीडीज इ.) चा बेकायदेशीर उपयोग करणे.

अशा वाचन साहित्याचा वापर हा ग्रंथालय वाचकाकडून दोन प्रकारे होत असतो.

१) प्रत्यक्ष ग्रंथालयांतर्गत अभ्यासासाठी वा उपयोगासाठी

२) ग्रंथालयाबाहेर



ग्रंथालयातंर्गत वापर व बहीर्गत वापर हा मोफत स्वरुपात उपलब्ध करुन दिला जात असल्यास व त्याचे स्वरुप नफा मिळविणे, शैक्षणिक प्रसार, संशोधन यासाठी नसेल तर त्यास ग्राह्य वापर किंवा चांगला वापर (Fair use) असे मानण्यात येते.

आजकाल ग्रंथालयातील वाचन साहित्य उपलब्ध करुन देण्यास माफक शुल्क आकारण्यात येत असले तरी देखील ती ग्राहक सेवाच संबोधिली जाते. यास्तव अशा स्वरुपाचा वापर बौध्दिक संपदा हक्क कायद्याच्या कक्षेत अंतर्भूत होऊ शकतो.

प्रत्यक्ष ग्रंथालयाव्दारे एखाद्या साहित्याच्या व इतर प्रलेखांच्या प्रती करुन केला गेलेला वापर हा गैरवाजवी ठरतो. वाचन साहित्याची छायांकित प्रत नोंदवून अशी प्रत वाचकांना किंमत आकारुन उपलब्ध करुन देणे हा कायद्याच्या दृष्टीने गुन्हा आहे. मात्र एखाद्या प्रलेखाच्या प्रतीच उपलब्ध नसतील तर बौध्दिक संपदा हक्क धारण करणाऱ्या व्यक्ती वा संस्था यांच्याकडून रजिस्टर लेखी परवानगी घेऊन,अशा प्रलेखांच्या अधिकाधिक तीन प्रती ग्रंथालयात उपलब्ध करुन देण्याची सुविधा या कायद्यांतर्गत करण्यात आलेली आहे.

या कायद्याबरोबरच पब्लिक लेंडींग राईटस् कायदा अलिकडे विचारात घेण्यात येत असल्याने नजीकच्या काळात त्यास अधिकृतता प्राप्त झाल्यास ग्रंथालयानी ग्रंथालय व्यवस्थापनाच्या दृष्टीने या बाबीचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. यामागची धारणा अशी की, लेखक आपल्या बौध्दिक प्रतिभेच्या सहाय्याने निर्मिती करीत असतो. अशा निर्मितीचे मुद्रण झाल्यानंतर केवळ एकाच वा मर्यादित प्रती ग्रंथालयाव्दारे खरेदी केल्या जातात. या प्रतीच्या आधारे अतिरीक्त वाचकांना त्यावर आधारित निशुल्क वा शुल्क आकारुन ग्रंथालयाव्दारे सेवा पुरविली जाते. अशा वापरामुळे प्रत्यक्ष बाजारात मुद्रित प्रतींच्या होणाऱ्या विक्रीवर अनिष्ट परिणाम होतो व त्याचा अंतिम फटका लेखकास बसतो. यामुळे लेखकाच्या बौध्दिक संपदा हक्कावर गदा येते.

यास ग्रंथालयेच एक प्रकारे जबाबदार ठरतात. म्हणूनच वाचकास देवघेव सेवेव्दारे उपलब्ध करुन दिलेल्या ग्रंथाच्या आॅकडेवारीवर आधारीत पी.एल.आर. अंतर्गत लेखकास द्यावयाचा मोबदला ठरविण्यात येतो.


एकूणच आय.पी.आर. चे स्वरुप लक्षात घेऊन व त्याला पी.एल.आर.चे सहाय्य मिळत असल्याने ग्रंथालय व्यवस्थापनाने प्रलेखाच्या छायांकित प्रती तयार करणे, प्रलेख देवघेव इ. बाबीतून कायद्याच्या चौकटी अंतर्गत किंवा त्याचे भान ठेऊन भविष्यात कार्यरत रहाणे गरजेचे आहे.

****

ासते. शोध घेऊनही साहित्य मिळत नाही तेव्हा त्याची किंमत कळते. त्यामुळे ग्रंथालय अशा प्रकारचे साहित्य जतन करून ठेवतात. काही ग्रंथालयामध्ये अशा प्रकारच्या साहित्याचे औद्योगिक, शैक्षणिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक असे वर्गीकरण करून साध्या खजूरी दोऱ्याने एकत्र बांधून त्याप्रमाणे वेगवेगळ्या ठेवण्यात येते आणि त्याचा उपयोग उपयोजकांना होतो.

संगणकाच्या युगात साहित्य शक्यतोवर सीडी तसेच दृकश्राव्य स्वरूपात प्रकाशित होते. त्यामुळे त्याचा फायदा उपयोजकांना उत्तमरितीने मिळतो. तथापि मुद्रित स्वरूपात ग्रे लिटरेचर असले तरी डिजिटाईट करून संगणकाच्या माध्यमातून औद्योगिक क्षेत्रातील उपयोजकांना त्यांच्या आवश्यकतेनुसार ते उपलब्ध करून दिल्या जाते. त्यामुळे त्यांचा वेळही वाचतो आणि चित्रीत स्वरूपात त्यांना माहिती प्राप्त होते.

अशा प्रकारे ग्रे लिटरेचरचा औद्योगिक क्षेत्रातील उपयोजकांना औद्योगिक विकासासाठी, ध्येयधोरण ठरविण्यासाठी, शासनाच्या योजना जाणून घेण्यासाठी आणि भविष्यातील संभाव्य धोके टाळण्यासाठी उत्तम रितीने होऊ शकतो.



ग्रे लिटरेचर खंड


## २.२ एकस्व/स्वामित्वहक्क (Patents)

सद्यस्थितीत समाज हा ज्ञानाधारित समाज असून त्यामध्ये भारत अग्रस्थानी आहे. ज्ञानाधारित अर्थकारणाचा पाया हा बौद्धिक संपदा अधिकार आहे. बौद्धिक संपदा अधिकार हा दिवसेंदिवस खूप महत्त्वाचा ठरत आहे. भारतात १९७० मध्ये स्वामित्वहक्क कायदा लागू करण्यात आला असून त्यामध्ये १९९९, २००२ आणि २००५ मध्ये अनेक सुधारणा करण्यात आल्या. कलकत्ता येथे स्वामित्वहक्काचे मुख्य कार्यालय आहे. त्याचबरोबर मुंबई, चेन्नई, दिल्ली आणि नागपूर येथेही कार्यालये आहेत. स्वामित्वहक्काचे भारतातील अर्ज सद्यस्थितीत वीस हजाराच्या वर आहेत. आतापर्यंत दोन लाखांपेक्षा अधिक ट्रेडमार्कस् प्रमाणपत्र निर्गमित केली असून एक लाखाच्या वर प्रमाणपत्र प्रतिक्षेत आहे. स्वामित्वहक्क दिवसेंदिवस खूप महत्त्वाचा ठरत असून ही एक मालमत्ता आहे आणि जीवनस्तर उंचावण्यासाठी महत्त्वाची ठरत आहे.

लेखनाची प्रक्रिया सातत्याने सुरू असते आणि लेखक लेखनाचे काम करीत असून प्रकाशक ते प्रसिद्ध करतात. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात काही व्यक्ती यामधील संपूर्ण मजकूर किंवा त्यातील काही भाग स्वतःच्या नावाने छापून प्रसिद्ध करतात. त्यामुळे मूळ लेखकाचे आणि प्रकाशकाचे महत्त्व कमी होऊन त्यामधील मूळ लेखात समाविष्ट असलेली महत्त्वाची माहिती तथा शोध याला धक्का पोहचतो आणि त्याचा परिणाम लेखक आणि प्रकाशकावर होतो. अशा प्रकारची बाब होऊ नये याकरिता स्वामित्वहक्क असणे अत्यंत आवश्यक आहे. अशा प्रकारचे कृत्य जर कोणी करीत असेल तर तो कायद्याने गुन्हा ठरतो आणि त्यासाठी शिक्षेची तरतूद आहे. याकरिता स्वामित्वहक्क आवश्यक आहे.

सद्यस्थितीत जागतिकीकरण झपाट्याने होत असून यामध्ये स्वामित्वहक्काला महत्त्वाचे स्थान आहे. याबाबतीत हळद आणि नीम या बद्दलची स्वामित्वहक्काची प्रकरणे जागतिक स्तरावर गाजली असून स्वामित्वहक्काच्या बाबतीत चर्चा झालेल्या आहेत. स्वामित्वहक्क हे इंडस्ट्रियल प्रॉपर्टीच्या अंतर्गत येते.

स्वामित्वहक्क हे शासन व शोधक यांच्यात झालेला करार असतो. या करारानुसार संशोधक त्याचा शोध जनतसमोर आणतो व त्या मोबदल्यात त्याला निश्चित कालावधीसाठी त्या शोधाचा पूर्ण उपयोग करण्याचे हक्क तो स्वतःकडे राखून ठेवतो. साधारणतः उत्पादन प्रक्रिया, प्रचलित प्रक्रियेला सुधारून केलेली नवीन प्रक्रिया, नवीन उत्पादन, लेखन व इतरही माहिती स्वामित्वहक्कामध्ये असते.



हळद एकस्व

**पेटंट म्हणजे काय?**

शासन व शोधक यांच्यातील करारास पेटंटस् असे म्हणतात. पेटंट हा सरकारने पेटंट धारकशी काही ठराविक कालावधीकरिता केलेला करार असतो. या करारानुसार शोधक त्यांच्या शोधाचा तपशील लोकांपुढे खुला करतो पण त्याच्या मोबदल्यात त्याला त्या शोधाचा स्वतःसाठीच फक्त उपयोग करण्याचा अबाधित हक्क काही काळापर्यंत त्याला प्राप्त होतो. प्रत्येक पेटंटमध्ये उत्पादनाची नवी प्रक्रिया किंवा प्रचलित असलेल्या उत्पादन प्रक्रियेत केलेली सुधारणा तसेच उत्पादित वस्तूची चाचणी आणि नियंत्रणाची नवी पद्धत यांचा तपशील सादर केलेला असतो. अशा प्रकारचा तपशील याच प्रकारच्या आधीच्या किंवा त्याचवेळी प्रचलित असलेल्या पद्धतीत नसतो.

**पेटंट कसे मिळते?**

पेटंट मिळण्याकरिता शोध हा नवीन असलाच पाहिजे आणि हा शोध उद्योग क्षेत्रासाठी उपयुक्त असायला हवा. यात उत्पादन पद्धती, वस्तू आणि त्यातील सुधारणा आणि त्यांचे शोध असले पाहिजेत. वस्तू जर आधीच प्रसिद्ध झालेल्या साहित्यात किंवा सर्वसाधारण ज्ञानाच्या रूपात लोकांना बाजारपेठेत उपलब्ध होत असेल तर त्या वस्तूचे पेटंट मिळणार नाही. काही वस्तूंच्या पेटंट दिल्या जात नाही.

**पेटंटचे फायदे :** पेटंटधारकांना पेटंट वापराचे विशेष हक्क दिलेले आहेत. त्याचे उल्लंघन झाल्यास तो कायदेशीर कारवाई करू शकतो. पेटंटच्या काळात त्याच्या परवानगीशिवाय त्याची नक्कल कोणीही करू शकणार नाही. त्या वस्तूच्या व्यापारी वापराचे सर्व हक्क पेटंटधारकाकडेच असतात. तो इतरांना व्यापारी वापराचा परवाना विकू शकतो. चांगली आणि स्वस्त उत्पादने बाजारात उपलब्ध व्हावीत आणि त्याचा ग्राहकाला जास्तीत जास्त फायदा व्हावा यासाठी शोध लागणे आवश्यक आहे.

(१) पेटंटमुळे सुरक्षितता प्राप्त होत असल्याने संशोधन आणि विकास प्रक्रियांना वेग प्राप्त होतो.

(२) पेटंटमुळे इतर कोणत्याही साधनांमध्ये न सापडणारी तंत्रज्ञानविषयक माहिती प्राप्त होते.

(३) पेटेमध्ये त्या नवीन शोधांची सर्वसामान्य उपयुक्तता काय, या माहितीबरोबरच त्या शोधाचे उद्योगधंद्यात प्रत्यक्ष व्यवहारिक उपयोजन कसे करावे याबद्दल त्या उद्योगाच्या पार्श्वभूमीसह माहिती मिळते.

(४) पेटंटचा कालावधी संपल्यानंतर हा शोध सर्व लोकांना पूर्णपणे उपलब्ध होतो.

(५) पेटंट हे तंत्रज्ञानाविषयक विशिष्ट बार्बीबद्दल पेटंटच्या अगोदरच्या साधनांपेक्षा अधिक परिपूर्ण अशी माहिती प्रगट करतात.

**पेटंट मिळण्याची पद्धत :** पेपंटचा संशोधक, त्याचा विद्यार्थी किंवा तो व त्याचे साथीदार संपूर्ण तपशीलासह योग्य त्या पेटंट ऑफिसमध्ये पेटंटसाठी अर्ज करू शकतात. पेटंटसाठी नोंद करणे हे सक्तीचे नाही पण ते न्याय्य व उचित आहे.

**पेटंट मिळण्याची पद्धत :** पेटंटसाठी संशोधक किंवा त्याचा विद्यार्थी किंवा तो व त्याचे साथीदार संपूर्ण तपशीलासह योग्य त्या पेटंट ऑफिसमध्ये पेटंटसाठी अर्ज करू शकतात. पेटंटसाठी नोंद करणे हे सक्तीचे नाही पण ते न्याय किंवा उचित आहे. पेटंटचे उल्लंघन झाले तर पेटंटची नोंद असली तरच योग्यरित्या कायदेशीर कारवाई करणे शक्य होते. पेटंट ऑफिसमध्ये सगळेच अर्ज कायद्याखाली नोंद केले जातात. पेटंट मान्य होण्यापूर्वी कोणताही व्यक्ती त्या पेटंटच्या मान्यतेवर आक्षेप घेऊ शकतो. परंतु पेटंट मान्य होण्यापूर्वी हा आक्षेप विचारात घेतल्या जाऊ शकतो.

**पेटंटचा कालावधी :** पेटंटसाठी अर्ज ज्या दिवशी केला त्या दिवसापासून २० वर्षापर्यंत पेटंटचा कालावधी राहतो. पेटेंटचीही तारीख ही पेटंट मिळविण्यासाठी ज्या दिवशी पेटंट मिळविण्यासाठी अर्ज केला त्या दिवशीचीच तारीख किंवा त्यानंतरची मागितलेली तारीख असते. अर्जाला कोणी विरोध केला नाही तसेच अर्ज फेटाळला गेला नाही आणि अर्जदाराचे म्हणणे मान्य झाले तरच पेटंटला परवानगी मिळते. पेटंट मान्य झाले की ऑफिस जर्नलमध्ये प्रसिद्ध होते. पेटंट जे अनुदान मिळते त्याला कोणतीही व्यक्ती ज्याला या पेटंटमध्ये रस असेल ती व्यक्ती विरोध करू शकते. परंतु ज्या दिवशी पेटंट प्रसिद्ध होते त्या दिवसापासून एक वर्षाच्या आत ज्या व्यक्तीला यामध्ये रस असेल ती व्यक्ती विरोध करू शकते.

**पेटंट वापरण्याची पद्धत :** ज्या पेटंट धारकांनी पेटंट रजिस्टर्ड केलेले आहे आणि ज्यांची नोंद केली आहे किंवा त्यांनी हे पेटंट वापरण्याकरिता ज्यांना परवानगी दिली आहे ते हे पेटंट वापरू शकतात.

**पेटंट रद्दबादीबद्दल :** एखाद्या व्यक्तीने नोंदणीकृत पेटंटची नक्कल केली हे उघड झाले तर मात्र पेटंट रद्द केले जाते. नोंदणीकृत पेटंटधारक किंवा ज्या व्यक्तीची नेमणूक याकरिता केलेली आहे. त्या व्यक्ती कोर्टात जाऊन हे पेटंट रद्द करण्याविरुद्ध कारवाई करू शकतात. पेटंटने कालावधी पूर्ण केल्यावर किंवा त्याचे नुतनीकरण झाले नसेल तर किंवा आधीच ते रद्द केले नसेल तर पेटंट रद्द होते.

**आंतरराष्ट्रीय सहकार्य :** बौद्धिक संपदा, व्यवस्थापन आधुनिक बनविण्यासाठी शासन आंतरराष्ट्रीय एजन्सीचे आणि इतर बौद्धिक संपदा अधिकाराच्या कार्यालयाचे उदा. जागतिक बौद्धिक संपदा मंडळ, युरोपियन, जपान, रशिया व इतर देश यांचे पेटंट ऑफिस यांचे सहकार्य मिळावे म्हणून जोमाने प्रयत्न करीत असते.

**जनहित रक्षण :** भारतात बौद्धिक संपदा अधिकार दीड शतकापूर्वीच अस्तित्वात आला असून त्याचे केवळ स्वरूप बदललेले आहे. हे स्वरूप एकाच कार्यालयापुरते मर्यादित राहिले नसून ते सेवेला महत्त्व देणारे आणि निष्णात लोकांच्या मंडळाचे स्वरूप प्राप्त झालेले असते. जनहिताचे रक्षण करण्यासाठी सरकार नवीन कायदे तयार करून बौद्धिक संपत्तीचे रक्षण करण्याकरिता आणि भारतीय उद्योगांमध्ये स्पर्धा निर्माण व्हावी व ती वाढीस लागावी याकरिता सतत प्रयत्नशील आहे.

## २.३ मानके आणि प्रमाणके (Standards & Specifications)

औद्योगिक ग्रंथालयामध्ये मानके आणि प्रमाणके यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. ग्रंथालयाचे कामकाज उच्च कोटीचे, सुदृढ, सक्षम आणि भविष्यकाळातील संभाव्य धोके, वाचकांची मागणी आणि माहितीच्या मागणीनुसार माहितीचा पुरवठा इ. बाबतीत आवश्यक आहे.औद्योगिक ग्रंथालयाचे विशेष ग्रंथालय या नात्याने मानके आणि प्रमाणके या बाबतची माहिती ग्रंथालयात असते. मानके म्हणजे संबंधित बाबींचे घटक आणि त्यांची व्याख्या करणारे दस्ताऐवज होय. औद्योगिक ग्रंथालये ही विशेष ग्रंथालयांच्या कक्षेत येत असल्याने त्या ग्रंथालयामधील उद्योगाच्या अनुरूप पायाभूत घटक आणि संबंधित माहितीची मानके निश्चित झालेली असतात.

सद्यस्थितीत कोणत्याही देशामध्ये वस्तूच्या निर्मितीसाठी किंवा सेवेच्या दर्जासंबंधी मानके तंत्राकडून तयार केली जातात. मानके ही त्या देशाच्या विशिष्ट संस्थेद्वारे तयार केली जातात. सुरक्षितता, निर्मितीचा दर्जा तसेच यंत्राचे सुटे भाग उपलब्ध होण्यासंबंधी, वापर आणि उपयोगासाठी एक सारखेपणा या उद्देशाने मानके तयार करण्यात येतात. राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय मानक संस्थेच्या नियंत्रणाखाली मानके तयार केली जातात. व्यावसायिक संघटना आणि शासकीय प्रतिनिधी मिळून स्थापन झालेली समिती मानके तयार करण्याचे काम करीत असते. मानकामध्ये समानता राहावी याकरिता सर्व देशांच्या संस्था एकमेकांच्या संपर्कात असतात.

ज्या दस्तऐवजांमध्ये कोणत्याही उद्योग वा संस्था, त्यामध्ये उत्पादित होणारी वस्तू, त्यावरील प्रक्रिया, दर्जा आणि यंत्र सामुग्री व तत्सम उपकरणे संचालनाची वैशिष्ट्ये प्रत्यक्ष उत्पादन, नामकरण या संबंधी माहिती, विशिष्ट चौकटीत असणारे घटक ज्यामध्ये यांची व्याख्या केलेली असते अशा प्रकारच्या दस्तऐवजांना मानके संबोधता येईल. भारतात खालीलप्रमाणे दिल्ली येथे भारतीय मानक ब्यूरो संस्था कार्यरत आहे.

**भारतीय मानक ब्यूरो, नवी दिल्ली :**

भारतात स्वातंत्र्यापूर्वी मानक ही संज्ञा फक्त सरकारी कार्यालयापुरतीच मर्यादित होती. शासकीय कार्यालयात खरेदी करताना तपशीलांतर्गत मानक पाहिल्या जात होते. स्वातंत्र्यानंतर आर्थिक विकास साधण्याच्या दृष्टीने आणि समन्वयासाठी संसाधनांच्या उचित उपयोगितेची आवश्यकता विचारात घेऊन औद्योगिक क्षेत्रातील उत्पादनामध्ये गुणवत्ता, क्षमता आणि दर्जा कायम राहण्याच्या दृष्टीने तसेच उपभोगत्यांचे हित आणि समाधान साधण्याच्या दृष्टीने मानकांची आवश्यकता भासू लागली. या सर्व बाबींचा विचार करून भारत सरकारने १९४७ मध्ये 'भारतीय मानक संस्था' (Indian Standards Institute, New Delhi (ISI) स्थापन केली. या संस्थेंतर्गत कारखान्यातील उत्पादनाच्या वाढीबरोबरच त्यामधील गुणात्मक दर्जा आणि सक्षमता यावर भर देण्यात आला. २६ नोव्हेंबर १९८६ मध्ये भारत सरकारने बदलती आर्थिक आणि सामाजिक स्थिती विचारात घेऊन राष्ट्रीय मानकाचे सबळीकरण करण्याकरिता कायद्यामध्ये बदल करण्याचे ठरविले. यानुसार १ एप्रिल १९८७ मध्ये सुधारणा करून 'भारतीय मानक ब्यूरो' (Bureau of Indian Standards, New Delhi) असे या कायद्याचे नामकरण करण्यात आले.